# संविधान दिन उत्साहात साजरा

आज संविधान दिन (२६ नोव्हेंबर) भारतभर साजरा केला जातो. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालीभारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसूदा समिती स्थापन झाली. अनेक बैठका व चर्चासत्रांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.

तसेच २६/११ च्या भ्याड हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या जवानांना व नागरिकांना महाविद्यालयाच्या विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून श्रद्धांजली वाहण्यात आली.

